**मुंबई शहर जिल्ह्यातील धारावी कोळीवाड्याचे सिमांकन अंतिम करण्यासंदर्भात शासनास शिफारशी करण्याकरीता समिती गठीत करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : ई-१६२१६०५/भूमापन**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १५ एप्रिल २०२६.

**संदर्भ** :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.२७२/ल-१, दिनांक २० नोव्हेंबर, २०१२

**प्रस्तावना :-**

बृहन्मुंबईतील कोळीवाड्यांच्या सिमांकनाबाबतची कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी ६ सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना सदर समितीचे नियंत्रक करण्यात आले होते. मुंबई शहर जिल्ह्यातील कोळीवाड्यांची सीमा ठरविण्यासाठी प्रत्यक्ष स्थळपाहणीअंती मोजणी करून सदर कोळीवाड्यांच्या सिमांकनासंदर्भात तयार करण्यात आलेल्या मोजणी नकाशावर विविध प्राधिकरणांनी हरकती नोदविल्या आहेत. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी यासंदर्भात शासनास अहवाल सादर केला होता. सदर अहवालाच्या अनुषंगाने संबंधित हरकतींवर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना कळविण्यात आले होते.

धारावी कोळीवाड्याची सीमा निश्चित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मोजणी नकाशावर धारावी पुनर्विकास प्रकल्प (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण) यांनी हरकत नोंदविली असून सदर विषयाबाबत स्थानिक सन्माननीय लोकप्रतिनिधीं व कोळी समाजाच्या संघटनांसोबत मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८.०४.२०२६ रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीत धारावी कोळीवाड्याच्या नकाशामधील बाह्य सिमांकनास मान्यता देण्याकरिता प्राप्त झालेल्या हरकतींच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करून शिफारशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

मुंबई शहर जिल्ह्यातील धारावी कोळीवाड्याचे सन २०१८ मध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयाने तयार केलेला मोजणी नकाशामध्ये दर्शविलेली सीमा कायम करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त, कोकण विभाग | अध्यक्ष |
| २. | जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ३. | अतिरिक्त आयुक्त (शहर), बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ४. | जिल्हाधिकारी, मुंबई शहर | सदस्य |
| ५. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | सदस्य |
| ६. | शहर अभियंता, नगर अभियंता खाते, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ७. | संचालक, पर्यावरण व वातारणीय बदल विभाग | सदस्य |
| ८. | सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई | सदस्य |
| ९. | उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश | सदस्य सचिव |

**२. समितीची कार्यकक्षा:**

१) जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयाने सन २०१८ मध्ये तयार केलेल्या धारावी कोळीवाड्याच्या सिमांकन मोजणी नकाशा अंतिम करण्याच्या अनुषंगाने शिफारस करणे.

२) सदर मोजणी नकाशावर प्राप्त झालेल्या हरकतींबाबत संबंधित हरकतदारांचे / कोळी संघटनांचे प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेणे व अंतिम निष्कर्षाप्रत येणे.

३) कोळीवाड्यांच्या सिमांकनासंबंधात अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.७/१०/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांबाबत केलेली कार्यवाही विचारात घेणे.

४) समितीस आणखी काही मुद्दयांचा चौकशीमध्ये समावेश करण्याची मुभा राहील.

**३.** सदर समितीस आवश्यकतेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालय तसेच धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडील धारावी कोळीवाड्याशी संबंधित कागदपत्रे मागविता येतील. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष स्थळपाहणी करता येईल.

**४.** समितीचे अध्यक्ष यांना विशेष निमंत्रित म्हणून त्यांना योग्य वाटेल अशा अधिकारी/ सेवानिवृत्त अधिकारी किंवा तज्ञ व्यक्तींना समितीच्या बैठकीसाठी आमंत्रित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. सदर समितीने आपला स्वयंस्पष्ट अहवाल शिफारशींसह ०३ महिन्यांच्या मुदतीमध्ये शासनास सादर करावा.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४१५१७२९५१८०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.04.15 17:31:21 +05'30'

**(संजय बनकर)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत.**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
१०.विभागीय आयुक्त, कोकण विभाग
११.जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. जिल्हाधिकारी, मुंबई शहर
१३.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
१४.संचालक, पर्यावरण व वातारणीय बदल विभाग
१५.सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई
१६.निवडनस्ती (भूमापन).